॥ श्री रामाची आरती ॥

श्रीरामाची आरती

त्रिभुवनमंडित माळ गळां । आरति ओवाळू पाहूं ब्रह्मपुतळा ॥ १ ॥
श्रीराम जयराम जयजय राम । आरति ओंवाळूं पाहूं सुंदर मेघश्याम ॥ धृ ॥
ठकाराचे ठाण वारीं धनुष्य बाण । मारुती सन्मुख उभा कर जोडून ॥ २ ॥
भरतशत्रुघ्न दोघे चामर ढाळिती । स्वर्गाहून देव पुष्पवृष्टी करीती ॥ ३ ॥
रत्नजडित हार वर्णू काय मुकुटी । आरती ओंवाळूं चौदा भुवनांच्या कोटी ॥ ४ ॥
विष्णुदास नामा म्हणे मागतो तूतें । आरती ओंवाळूं पाहूं सीतापतीतें ॥ ५ ॥

Please send corrections to Pradip Sagdeo psagdeo@aol.com
Last updated January 5, 1999